आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ३२ वा ● शुक्रवार दि. २१ जून २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


### मातंग समाजाच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक !

मुंबई : मातंग समाजाच्या विविध मागण्या आहेत. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय स्मारक, वाटेगांव, जि. सांगली येथील अण्णाभाऊ साठे स्मारक, पुण्यातील लहुजी वस्ताद साळवे स्मारक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची (आर्टी) स्थापना आदींबाबत वेगाने कार्यवाही करण्यात यावी. मातंग समाजाच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासन सकारात्मक आहे, असे उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत आयोजित बैठकीत मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे, समाजकल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, 'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे, मातंग समाज शिष्टमंडळाच्यावतीने प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे, श्री. वाडेकर आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सांगलीचे जिल्हाधिकारी राजा दयानिधी सहभागी झाले होते.काही राज्यात अनुसूचित जाती प्रवर्गाचे जातीनिहाय उपवर्गीकरण केले आहे.

# लातूर जिल्हा रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न निकाली

## ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये आरोग्य विभाग अदा करणार,साठ दिवसाच्या आत हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश माझं लातूर परिवाराच्या ऐतिहासिक आंदोलनास अखेर यश

लातूर, (प्रतिनिधी) – जिल्हा रुग्णालय लातूरसाठी कृषी महाविद्यालय लातूर येथील दहा एकर जमीन हस्तांतरणास मंजुरी देण्यात आली आहे. आरोग्य विभागाच्या वतीने ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये अदा करण्यात येणार असून जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया साठ दिवसात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा रुग्णालयाच्या प्रश्नासाठी माझं लातूर परिवाराच्या वतीने म. गांधी चौक येथे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत हा निर्णय झाल्याने लातुरात नागरिकांना आणखी एक आरोग्याची सुविधा उपलब्ध झाली म्हणून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



लातूरचे नेते दिवंगत विलासराव देशमुख यांनी लातूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामुळे लातूरचे जिल्हा रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आले. नियमाप्रमाणे जिल्हा रुग्णालय पाच वर्षात होणे आवश्यक असताना त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. जिल्हा रुग्णालयाला मंजुरीही देण्यात आली होती तर विद्यमान सरकारने पाचशे खाटाच्या जिल्हा रुग्णालयास मान्यता दिली. परंतु ते कागदावरच राहिले होते.

माझं लातूरच्या वतीने या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. लातूर जिल्ह्यातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्यासह थेट मुंबईत जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालकमंत्री यांना निवेदनही देण्यात आली होती. म. गांधी चौकात आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्र्यासह सर्वांनीच हा प्रश्न तातडीने निकाली काढू, असे आश्र्वासन दिले होते. १९ जून रोजी यासंदर्भात शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार कृषी विद्यालय लातूर येथील सर्वे नंबर ३७ मधील १० एकर जमीन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्याकडून जिल्हा रुग्णालयासाठी हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली. सदरील जमिनीचा मोबदला ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. जमीन हस्तांतरणाची कार्यवाही महसूल विभागाच्या वतीने जिल्हाधिकार्यांनी पूर्ण करावी. हस्तांतरणासाठी दोन्ही विभागामार्फत सामंजस्य करार जिल्हास्तरावर करण्यात यावा. जमिनीच्या अभिलेखात सार्वजनिक आरोग्य विभाग जिल्हा शल्य चिकित्सक लातूर याचा स्पष्ट उल्लेख करावा. महसूल विभागास देय रक्कम विद्यापीठाने अदा करावी. जास्तीत जास्त साठ दिवसाच्या आत हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. वित्त विभागाने याची तरतूदही केलेली आहे.

या जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवारातील सदस्यांसोबतच आमदार अमित देशमुख, आमदार धीरज देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ प्रदिप ढेले, डॉ लक्ष्मण देशमुख, डॉ अर्चना पाटील चाकूरकर, ॲड. बळवंत जाधव, माजी खासदार सुनिल गायकवाड, अभिजीत देशमुख, ड. किरण जाधव, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, दिपक सुळ, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, विश्र्वजीत गायकवाड, खासदार डॉ. शिवाजी काळगे, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, मंत्री संजय बनसोडे, यांच्यासह अनेकांनी पाठपुरावा केला होता. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना यांच्यासह विविध ५८ पक्ष संघटनांनी जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूरच्या आंदोलनास पाठिंबा दिला होता.

### ओबीसी आरक्षण बचावसाठी भोकरमध्ये सरणावर आंदोलन

भोकर – मराठा समाजाला ओबीसीतून




आरक्षण देऊ नये, सगेसोयरे संदर्भात जीआर काढू नये या मागणीसाठी भोकरमध्ये २० जून रोजी आगळे वेगळे आंदोलन सुरू झाले असून चित्तेवर बसून आमरण उपोषण संजय दिगंबर गौड आलेवार रा. भोकर यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला देऊन आंदोलनास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्रात मराठा समाजाला सगेसोयरे या सबबीखाली आणि एकूणच ओबीसी आरक्षणातून जीआर काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाने हालचाली सुरु केल्या असून मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश झाल्यास ओबीसीच्या संवैधानिक आरक्षणाचा हक्क हिरावल्या जाईल, त्यामुळे ओबीसीच्या आरक्षणात सगे सोयरेच्या नावाखाली घुसखोरी नको त्यासाठी लोकशाही मार्गाने भोकर तहसील कार्यालयासमोर चितेवर बसून आमरण उपोषण सकल ओबीसी भटके विमुक्त समाजाच्यावतीने करणार असल्याचे संजय दिगंबर गौड यांनी निवेदनात म्हटले आहे. निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी भोकर पोलीस स्टेशन भोकर यांना देण्यात आल्या आहेत.

### खरीप पिकांसाठी किमान हमी भावात वाढ केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

नवी दिल्ली, दि. २० : उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांसाठी योग्य किंमत मिळावी यासाठी विपणन हंगाम २०२४–२५ करिता सर्व अनिवार्य खरीप पिकांच्या किमान हमी भावात (एमएसपी) वाढ करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी घेण्यात आला.

मागील वर्षाच्या तुलनेत, कारळे (९८३ प्रति क्विंटल), तीळ (६३२ प्रति क्विंटल), आणि तूर/अरहर (५५० प्रति क्विंटल) यांसारख्या तेलबिया आणि कडधान्यांच्या एमएसपीमध्ये सर्वाधिक वाढ करण्यात आली आहे.

खरीप पिकांसाठी एमएसपी निश्र्चित करताना, भाड्याने घेतलेले मानवी श्रम, बैल मजूर/यंत्र मजूर, भाडेतत्वावर दिलेले भाडे, बियाणे, खते, सिंचन शुल्क इत्यादी खर्च, तसेच खेळत्या भांडवलावरील व्याज, पंप संच चालवण्यासाठी डिझेल/विद्युत खर्च आणि कौटुंबिक श्रमाचे योग्य मूल्य या सर्व घटकांचा विचार केला गेला आहे.

केंद्र सरकारने वर्ष २०२४–२५ साठी विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान हमी भावात (एमएसपी) वाढ जाहीर केली आहे, जी केंद्रीय अर्थसंकल्प २०१८–१९ मध्ये ठरविलेल्या नियमानुसार उत्पादन खर्चाच्या किमान १.५ पट असणार आहे. खासकरून, बाजरीसाठी (७७%), तुरीसाठी (५९%), मक्यासाठी (५४%), आणि उडीदसाठी (५२%) एमएसपीमध्ये उत्पादन खर्चाच्या तुलनेत जास्त लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. इतर पिकांसाठी, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा ५०% अधिक लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

ही घोषणा सरकारने तृणधान्ये, कडधान्ये आणि पोषणमूल्य असलेली धान्य यासारख्या विविध पिकांच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी केली आहे. भात (ग्रेड अ), ज्वारी (मालदांडी), आणि कापूस (लांब मुख्य) यासारख्या पिकांच्या उत्पादन खर्चाची स्वतंत्र माहिती उपलब्ध नसली तरी, शेतकऱ्यांना या पिकांसाठी देखील ५०% पेक्षा अधिक लाभ अपेक्षित आहे. सरकारने उच्च किमान हमी भाव देऊन पोषणमूल्य असलेल्या विविध पिकांच्या लागवडीला चालना देण्याचा निर्णय घेतला आहे, **(पान २ वर) ...**




### बनावट, अवैध मद्य विक्री विरोधात धडक कारवाई करावी - मंत्री

मुंबई, : बनावट मद्य निर्मिती, परराज्यातील अवैध मद्य विक्रीची प्रकरणे निदर्शनास येत आहेत. त्यामुळे विभागाने या प्रकरणांमध्ये धडक कारवाई करावी. परराज्यातील अवैध मद्याची वाहतूक व विक्री सीमेवरील कोल्हापूर, सिंधुदुर्ग, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये होत असते. या जिल्ह्यांतील कारवाईचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

### बाभळगावातील वीज पडून दुर्दैवी मृत्यू झालेले शेतकरी अंगद शिंदे यांच्या वारसांना महसूल विभागाकडून ४ लाखांच्या आर्थिक मदतीचा धनादेश

लातुर प्रतिनिधी : लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील शेतात काम करीत




असताना शेतकरी अंगद अंबादास शिंदे यांचा ११ मे रोजी अंगावर वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. शिंदे कुटुंबियांची परिस्थिती आणि अंगद शिंदे यांचा अकाली मृत्यू लक्षात घेता राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आम१दार अमित विलासराव देशमुख यांनी आणि बाभळगाव ग्रामपंचायतने केलेल्या पाठपूरावामुळे महसूल विभाग लातुर यांच्याकडून गुरुवार दि. २० जून रोजी मयत शेतकरी अंगद शिंदे यांच्या वारस असणाऱ्या त्यांच्या पत्नी मंगलबाई शिंदे यांना ४ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे, तसा आर्थिक मदतीचा धनादेश लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी लातुर शहर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव, उपसरपंच गोविंद देशमुख, मंडळ अधिकारी सुनील लाडके, गोविंद जोशी, संतोष शिंदे यांची उपस्थिती होती. लातूर जिल्हयात पावसाळ्यात वीज पडून जीवितहानी होण्याच्या घटनात होणारी वाढ पाहता बाभळगाव येथे लायटनिंग अरेस्टेड टॉवर उभारण्यात यावे अशी मागणी बाभळगाव ग्रामपंचायतच्या वतीने एक ठराव घेऊन करण्यात आली असून याबाबतचे लेखी निवेदन देखील यावेळी लातुरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांना उपसरपंच गोविंद देशमुख यांनी दिले.

### मराठा आरक्षणासाठी अधिवेशनात एक दिवस राखीव ठेवा

लातूर / प्रतिनिधी : मराठा आरक्षणासाठी पावसाळी अधिवेशनात एक दिवस राखीव ठेवून चर्चा घडवावी, अशी मागणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी केली. या मागणीचे पत्र त्यांनी विधानसभा अध्यक्ष श्री राहुल नार्वेकर यांना गुरुवारी दिले.



पावसाळी अधिवेशन २७ जून ते १२ जुलै या कालावधीत होत आहे. मराठा समाजाच्या मागण्या अद्याप मान्य झाल्या नाहीत. मराठा समाजाला कायद्याच्या कसोटीवर टिकणारे आणि सगे–सोयऱ्यांच्या निकषात बसणारे आरक्षण मिळावे, अशी मागणी आहे. या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांना उपोषणाला बसावे लागत आहे. सरकार या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करताना दिसत आहे.

या पार्श्र्वभूमीवर आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी पत्र पाठवून विधानसभा अध्यक्ष श्री राहुल नार्वेकर यांच्याकडे अधिवेशनातील एक दिवस मराठा आरक्षणासाठी राखीव ठेवण्याची मागणी केली आहे. यावर्षी २० फेब्रुवारी रोजी विशेष अधिवेशन घेत राज्य सरकारने मराठा समाजाला १०% आरक्षण जाहीर केले, त्यातील तरतुदी आणि जानेवारीमध्ये वाशी येथे श्री. जरांगे पाटील यांना सरकारने दिलेल्या अश्र्वसानामध्ये फरक आहे. त्यामुळे श्री. जरांगे पाटील मागील आठवड्यात पुन्हा उपोषणास बसले होते. सरकारच्या आश्र्वासनाचा मान ठेऊन त्यांनी १३ जुलैपर्यंत उपोषण स्थगित केले आहे. फेब्रुवारीमध्ये आरक्षणाचा निर्णय घाईने घेतल्यामुळे आरक्षणाची वैधता आणि तरतुदी याबद्दल मराठा समाजामध्ये संशयाचे वातावरण आहे. याकडेही आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी पत्रातून लक्ष वेधले आहे.

### बँकांनी लाभार्थ्यांची प्रकरणे वेळेत मार्गी लावावीत – अध्यक्ष नरेंद्र पाटील

छत्रपती संभाजीनगर (जिमाका)– अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या माध्यमातून राज्यात ९२ हजार १४४ लाभार्थ्यांना उद्योगासाठी ७ हजार ३३० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ८६०३ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ झाला असून महामंडळामार्फत स्वयंरोजगारासाठी राबविण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी बँकांनी पात्र लाभार्थ्यांची कर्ज मंजुरीची प्रकरणे कालमर्यादेत मार्गी लावावेत, अशी सूचना महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी केली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आज महामंडळाच्या योजनांची आढावा बैठक पार पडली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार, जिल्हा उपनिबंधक मुकेश बारहाते, महामंडळाचे **(पान २ वर) ...**




आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – लोकसभेचा धुराळा उडविण्याच्या पूर्वीच विधानसभेचे वारे वाहू लागले आहेत. त्यात भाजपा महायुती, आणि महाविकास आघडी मध्ये परस्पर रणनिती आखली जात असतानाच बंडाचे वारे वाहू लागले आहेत. हे काही कळतच नाही. मन संताप होताना दिसतो आहे.

दुसरा – सत्तेसाठी लांगूलचालंन करणारे लोक हे पक्ष निष्ठा किंवा लोक विश्वासाची आचारसंहिता पाळत नाहीत. कारण त्यांच्या समोर विजय कसा होईल हाच एकमेव उद्देश असतो. त्यामूळे भाजपा, कॉग्रेस किंवा शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेसचा कोणताही गट असो त्यातून उभे राहून लोकप्रतिनिधी बनण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामूळे तू मनस्ताप करण्याची गरजच काय.

एक – अहो, शरद पवार यांनी तर महाराष्ट्र कोणहाती घेणार, त्यांचे मी बगतो. अस आवहान केले आहे. त्यामूळे मोदी विरुध्द शरद पवार, असाच सामना होईल का अशी भिती वाटते म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, पवार आणि मोदी काय,,हे सत्तेसाठी हापापलेले नेते आहेत. त्यांची धारणा वेगळी असली तरी, सत्ताकेंद्र हाच त्यांचा मानस असतो. त्यामूळे काळजी करण्याचे कारणच नसावे.

एक – अहो, असे गाफील बसून कसे चालणार. महाराष्ट्र हा लोकशाही धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचाराचा आहे, त्यात धर्म आणि जातीयवादाने पोखरलेले विचार महाराष्ट्राला कसे काय परवडतील हा प्रश्न महत्वाचा असल्याने माझ्या सारख्याना चिंता वाटते आहे.

दुसरा – अरे, तूझ्या चिंता करण्याने महाराष्ट्र हा फुले, शाहू, आंबेडकरांचा राहूच शकत नाही. कारण महाराष्ट्रातील आंबेडकरवादी नेते, आठवले हे मोदीची ताळीपिठा करतात, तर वंचितच्या माध्यमातून ॲड. प्रकाश आंबेडकर हे विधानसभा निवडणूकीची स्वबळावर लढण्याची भाषा करतात. मग मोदीचा जय की, शरद पवारचा विजय याचे काय ?

एक – अहो, असे कोड्यात टाकून सर्व सामान्य जनतेला बुचकाळ्यात पाडू नका त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे त्या बद्दल बोला.

दुसरा – अरे, अंधळ्या पुढे नाचून आणि बहिऱ्यापूढे गावून कांहीच फायदा नसतो. गाढवाणे गीता वाचली तर हलगटाने भगवत गीतेवर दावा केला तर त्यासमोर मोदी, शहा, पवार, आंबेडकर, आठवले ही निशब्द होतील. त्याचे निराकारण कोण करणार हे तूच ठरव.

# शंभरकोटी म्हणजे काय बुवा ?

## संपादकीय...

राजकारण, सत्ताकारण हा सापसीडीचा खेळ असला तरी, ते एक कलगीतूराच असतो. त्यात जित आणि पट असतेच. त्यातून तमाम राजकीय पक्षांची चित आणि पट होतच असते. तो लोकशाहीचा गुणधर्मच आहे. पंरतू सत्तेच्या माजावर सत्ताधारी लोक आपापल्या मनाप्रमाणे सत्ताकेंद्रीत ठेवण्यासाठी मनमुराद सत्ताकारण करीत असतात. ही जागतीक स्तरावरची रितच बनली आहे. त्यात भारतीय लोकशाहीच्या राजकारणाने परिसीमा बोलांडली असून कांही गवसत नाही, पण सत्ता केंद्रीत केली पाहिजेत म्हणून सत्ताजाळाच्या राजकारणात कोणालातरी कसलाही आधार नसताना कोंडून ठेवायचे आणि सत्तेसाठी मी आणि आम्ही तरबेज असल्याचे सिध्द करायचे हि परंपरा प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी चालू ठेवल्याची प्रतिक्रीया राजकीय वर्तूळातून प्रभावीत पणे मुटताना दिसते आहे. कारण असे की, प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांचा सत्तेच्या सारीपाठाचा हव्यास इतका बळावलेला आहे की, लोकशाही भारताची त्रेधातिरपट कशी होते आहे, याचेही भान राहीले नसावे अशी कुजबूज होताना दिसते आहे.

वास्तवीक पाहाता धर्मनिरपेक्ष सामाजीक न्यायावर कार्यरत असलेल्या भारतीय सत्ताकारणाला गालबोट लावून प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे भारताचे मसिंहा होवू पाहात असले तरी त्यांची रित चुकीचीच असावी अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे. एकंदरीत नरेंद्र मोदी हे निस्वार्थी, प्रामाणीक व्यक्तीत्व असलेले राजकीय व्यक्ती आहेत असे मान्य केले तरी ही त्यांची कार्यपध्दती ही संसयाच्या भोवऱ्यात अडकलेली दिसते. कारण असे की, कॉग्रेस मुक्त भारत, भ्रष्टाचार मुक्त भारत असा गवगवा करुनही गेल्या दहा वर्षा मध्ये लाचखोरी, महागाई, भ्रष्टाचाराचे स्तोंभ वाढलेले दिसते आहे. पंरतू प्रशासकीय यंत्रणेला हाताशी धरुन इतर पक्षाच्या राज्यकर्त्यांना संसयीत आरोपाखाली डांबून त्यांचे खच्चीकरण करणे, आणि लोकशाहीचा टेंबा मिरविणे हाच एक उद्योग मोदी सरकारचा एकमेव प्रशासकीय व्यवसाय असल्याचेच समोर दिसते आहे. केवळ राहूल गांधी आणि शरद पवारांचे हात छाटण्यासाठी जो कांही आटापिटा व्यक्ती म्हणून नव्हे तर पंतप्रधान पदाची झ्यालर पांघरुन प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे कार्यरत असल्याचेच स्पष्ट होते. मागील काळात एकवट असलेल्या राष्ट्रवादी कॉग्रेसचे माजी मंत्री अनिल देशमूख यांच्यावर शंभरकोटीची हप्तेवारी घेत असल्याचा आरोप केला गेला. अजित पवार यांच्यावर जलसिंचन विभागातील भ्रष्टाचार आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यावर गृहनिर्माण सोसायटीतील कथीत गाळा वाटपा संदर्भात आरोप दाखल करण्यात आले. आजघडीला लोकसभा निवडणूकीपूर्वी आणि लोकसभा निवडणूकी नंतर ही दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर मद्य घोटाळा प्रकरणी शंभर कोटी रुपयाच्या लाचेची संसयीत आरोप करुन त्यांना कारागृहात डांबले जाते, परंतू देणारा कोण आणि घेणारा कोण याची शहानीशा न करता एक तफ्रि कायदा लादून एखाद्या राज्यकर्त्याला डांबून ठेवणे भारतीय राजकारण आणि सत्ताकारणाला अशोभनिय ठरावे अशीच संवेदनात्मक प्रतिक्रिया प्रसार माध्यमातून व्यक्त होताना दिसते आहे. एकीकडे व्यक्ती स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याला खुलेआम वाव आहे असा गवगवा करायचा आणि विरोधा मध्ये गेल्यानंतर त्यांच्यावर बंदी हूकूम लादायचा अशीच प्रक्रिया नरेंद्र मोदी करीत असताना दिसतात. त्यामूळे शंभरकोटीचे काय बुवा, अशी कुजबूज सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसते आहे.

मागील काळात अनिल देशमूखावर झालेल्या आरोतून देशमूख निर्दोष ठरले, पण त्यांची झालेली अब्रू नुकसानीचे काय ? असा अनुत्तरीत प्रश्न असला तरी, चव्हाण–पवार भाजपाच्या दारात गेले. पंरतू अरविंद केजरीवालाचे काय ? हा प्रश्न चर्चेतच राहातो आहे. सत्ता हे सर्वसामान्याचा विकास करण्याचा एक माध्यम असते. देशाची प्रगती आणि नागरीकांचे प्रश्न सुलभरितीने सोडविणे हे सरकारचे आद्य कर्तव्य असताना ही अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, आणि दहशतवादाला वाव दिला जातो. हीच प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांची मन की बात, असावे की काय, असा ही संभ्रम होताना दिसतो आहे.

आम्ही भारतीय लोक म्हणून, भारतीय संविधानानुसार कार्यरत असताना मागेपुढे कसलाच विचार न करता केंद्र सरकार मनमानी कारभार करीत असेल तर परदेशी शक्तीचे भारतावर अतिक्रमन होणार नाही काय, याची काळजी कोण घ्यावी असा ही प्रश्न सर्वसामान्य जनते समोर पडलेला दिसतो आहे. कारण असे की, लोकहीत आणि देशहित बाजूला सारुन नरेंद्र मोदी हे रामा नंतर विश्वगुरु होण्याचा संकल्प करुन कार्यरत असावेत की काय, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला न उलगडणारा एक प्रश्नच असून गंगामातेने मला दत्तक घेतल्याचीच भावना प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे वाराणसी मध्ये बोलतात पंरतू गंगेच्या वहिवाट पाण्या मध्ये किती घाण आहे, मृतदेहासह अन्य प्राणी कसे नासून वहात असतात, त्या गंगा नदीतले पाणी स्वच्छ करण्यापेक्षा नरेंद्र मोदी हे राजकीय विरोधी पक्षाना संशयात्मक धोरणातून संपूष्ठात आणू पाहातात. हे सारे कपटकारस्थान समोर असताना स्वतःच्या दौऱ्यावर हजारो कोटी रुपयाचा चुराडा करणारे नरेंद्र मोदी हे कपोलकल्पीत शंभरकोटी रुपयाच्या आरोपोखाली विरोधी पक्षाच्या नेत्याना कारागृहात डांबत असतील तर गेल्या दहा वर्षातील मोदी, शहा, राजनाथसिंह, यांच्या दौऱ्यातील खर्च जनते समोर जाहिर करावा आणि तो पैसा जनतेचा की, मोदी, शहा, राजनाथसिंह यांच्या खिशातला आहे हे स्पष्ट करावे अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

वास्तविक पाहाता कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी, ते जनतेच्या पैशावरच कार्यरत असते. पण प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे मी हे केले ते केले, अगोदरच्या सरकारने देशाला बुडवीले, असे म्हणतात, पंरतू मोदी हेच भारतालाच गहाण ठेवू पाहातात, मग शंभर कोटीचे काय बुवा, यांचा उहापोह कोण करणार एवढेच.

# काय बोलता राव ?

संशोधनात्मक शिक्षणावर भर देणार असल्याचे स्पष्टीकरण प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी बिहार मधील नालंदा विश्वविद्यापीठाच्या नव्या परिसराचे उद्‌घाटन करता केले. परंतू स्वतंत्र पूर्व काळापासून नालंदा विश्वविद्यापिठाची काय अवस्था आहे, ती आजवर का रखडली गेली, असा प्रश्न तेथील पत्रकारानी विचारला असताना भारत हे ज्ञान आणि शिक्षणाचे जागतीक केंद्र मीच बनवू इच्छितो आहे, असे स्पष्ट केले. त्यामूळे पत्रकार अचंबीत झाल्याचे दिसत होते.

**काय बोलता राव,**

अरे, प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान झाल्या नंतर त्यांनी काय दिवे लावलेत हे समोर दिसते आहे. साधारणतः आठशे वर्षापूर्वी बाराव्या शतकात देशभरातील विद्यार्थी नालंदा विश्वविद्यापीठात संशोधनासाठी येत होते.

परंतू त्या विद्यापीठावर आक्रमन केले गेले, नालंदा विद्यापिठासह लंडन मधीन बाबासाहेबांचे निवासस्थान, मुंबई येथील चैत्यभूमी, इंदू मिल परिसर, दिल्ली आणि महू येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक बनविण्यासाठी गेल्या दहा वर्षा मध्ये केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, बिहार सरकार आणि मध्यप्रदेश सरकारने काय दिवे लावले. हे आंबेडकरी जनतेला माहितच आहे. मग पिंजरा चित्रपटातील गुलब्या प्रमाणे आजघडीला प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे गुलगुलाबी भाषा करीत असतील तर मग बोला दाजीबा !

# रमाई आवास घरकुल व मोदी आवास घरकुल साठी शासन जी.आर.नुसार वाळु तात्काळ द्यावी: नईम आत्तार

माजलगाव (प्रतिनिधी)तालुक्यातील शहर व ग्रामीण भागात वाळु ढिगारे अनाधिकृतपणे साठवलेले आहे ते जप्त करुन रमाई आवास योजना व मोदी आवास योजनाच्या घरकुल धारकास तात्काळ द्यावी,अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे अल्पसंख्याक बीड जिल्हा सरचिटणीस नईम करीम आतार यांनी माजलगाव तहसीलदार यांच्याकडे निवेदन द्वारे मागणी केली.

शासन जीआर नुसार तात्काळ रमाई घरकुल व मोदी आवास घरकुल या योजनेसाठी ग्रामीण भागातील मंजूर झालेले रमाई घरकुल योजना व मोदी आवाज घरकुल योजनांच्या गोरगरीब लोकांना वाळू घर बांधकामासाठी मिळत नाही.परंतु अवैधरित्या अंदाजे सहा ते सात हजार रुपये ब्रास ने वाळु




माफिया विक्री करत आहे.

तालुक्यातील अनधिकृत विक्री होत असलेली वाळू सामान्य गोरगरीब विकत घेऊ शकत नाही.रमाई घरकुल १,३८,००० एकुण मंजुर रक्कम आहे.अल्प रक्कम असल्याने घरकुल बांधण्यासाठी अनेक समस्यास सामोरे जावे लागत आहे.शासन जीआर नुसार सहाशे रुपये ब्रास प्रमाणे वाळू गोरगरीब लोकांना त्यांचे मंजूर झालेल्या घरकुलसाठी तहसीलदार माजलगाव यांनी तात्काळ द्यावी,अशी मागणी निवेदकांनी केली आहे.

तालुक्यातील ग्रामीण व शहरातील अनधिकृत वाळु ढिगारे जमा झालेले आहे ते जप्त करून त्याचे लिलाव करून शासन परिपत्रकानुसार पंचायत समिती यांच्याकडून घरकुलधारकांची यादी मागवुन घ्यावी,असे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया चे जिल्हा सरचिटणीस नईम आतार यांनी निवेदन देवुन मागणी केली.

# आंतरराष्ट्रीय योग दिन

आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला. २१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे.

पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला.

पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनीधी आहेत. याप्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दीनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग.

आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे.

आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# कचरा समस्या ; लातूर शहर भाजपाचा मनपावर निषेध मोर्चा पालिकेला चारदिवसांचा अल्टीमेटम

लातूर/प्रतिनिधी : शहरातील कचऱ्याची समस्या गंभीर असून मनपा प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे.यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून मनपाला त्याची जाणीव करून देण्यासाठी लातूर शहर भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या नेतृत्वात पालिकेवर निषेध मोर्चा काढण्यात आला. आयुक्तांना कचरा भेट देऊन शहर स्वच्छतेसाठी चार दिवसांचा अल्टिमेटम यावेळी देण्यात आला.

लातूर शहरात कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहे.मनपाच्या वतीने दररोज कचऱ्याचे संकलन केले जात नाही. शहरातील विविध भागात रस्त्यावर आणि खुल्या प्लॉटमध्ये कचऱ्याचे ढीग साठले आहेत.घंटागाड्या नियमित येत नसल्याने नागरिकांकडून कचरा रस्त्यावर टाकला जात आहे.पावसाळ्याचे दिवस असल्याने या कचऱ्याची दुर्गंधी पसरत असून शहरात फिरणेही कठीण झाले आहे.पावसाळ्यापूर्वी गटारी व नाल्यांची स्वच्छता करण्याची आवश्यकता असताना



मानपाने ती केलेली नसल्याचेही दिसून येत आहे.पहिल्याच पावसात गटारी तुंबल्यामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरल्याचेही दिसून आले आहे.शहराची अवस्था बकाल झाली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

वारंवार सूचना करूनही पालिका प्रशासन याबाबत पाऊले उचलत नसल्याने गुरुवारी (दि.२० ) भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या नेतृत्वात मनपावर मोर्चा काढण्यात आला.यावेळी रस्त्यावर पडलेला कचरा टोपल्यात जमा करून मनपा आयुक्तांना भेट देण्यात आला.घंटागाड्यांच्या माध्यमातून दैनंदिन कचरा संकलन केले जावे. रस्त्याच्या कडेला व खुल्या मैदानात साठलेला कचरा तात्काळ उचलण्यात यावा.पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता नाले व गटारींची तात्काळ स्वच्छता करण्यात यावी,आदी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.चार दिवसांच्या आत शहरातील संपूर्ण कचरा उचलून स्वच्छता करण्यात आली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.

या आंदोलनात अजित पाटील कव्हेकर,प्रदेश कार्यकारीनी सदस्य रवि सुडे, ड. दिग्विजय काथवटे,शिरीष कुलकर्णी,गणेश गोमसाळे,रागिनीताई यादव, प्रविण सावंत, अनंत गायकवाड, अमोल गिते,अजय भूमकर,आबा चौगुले, चंद्रकांत खटके,गणेश गवारे,शोभा पाटील, संजय गीर, अनिल पतंगे, देवा साळूंकू, मंगेश बिराजदार, प्रमोद गूडे, दत्ता चेवले, विशाल हवा पाटील, मोहसीनभाई शेख, भरत लोंढे, महादेव कानगूले, हेमाताई येळे, शीतलताई पाटील राजन सोनवणे यांच्यासह भाजपा पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# खरीप पिकांसाठी किमान हमी भावात वाढ केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी ....

**(पान १ वरुन) :** ज्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल तसेच विविध प्रकारचे अन्नधान्य उत्पादन वाढीस लागेल.

देशात खरीप हंगामातील विपणनात २००३–०४ ते २०१३–१४ या कालावधीत, बाजरीसाठी एमएसपीतील दर रु.७४५ रुपये प्रति क्विंटल आणि मुगासाठी रु.३,१३० रुपये प्रति क्विंटल होता. त्यानंतर, २०१३–१४ ते २०२३–२४ या कालावधीत, एमएसपी मध्ये किमान परिपूर्ण वाढ झाली. मक्यासाठी ७८० रुपये प्रति क्विंटल आणि कारळासाठी ४,२३४ रुपये प्रति क्विंटल होती.

वर्ष २००४–०५ ते २०१३–१४ या कालावधीत, खरीप विपणन हंगामाअंतर्गत समाविष्ट १४ पिकांची खरेदी ४,६७५.९८ लाख मेट्रिक टन होती, ज्यामुळे २०१४–१५ ते २०२३–२४ या कालावधीत या पिकांची खरेदी ७.५८ लाख मेट्रिक टन होती.

वर्ष २०२३–२४ च्या तिसऱ्या सुधारित अंदाजानुसार देशातील एकूण अन्नधान्य उत्पादन ३,२८८.६ लाख मेट्रिक टन आणि तेलबियांचे उत्पादन ३९५.९ लाख मेट्रिक टन होणार असून, या वर्षाच्या उत्पादनाच्या अंदाजानुसार तांदूळ, कडधान्ये, तेलबिया, पौष्टिक तृणधान्ये/श्री अन्न आणि कापसाचे खरीप उत्पादन १,१४३.७ एलएमटी, ६८.६ एलएमटी, २४१.२ एलएमटी, १३०.३ एलएमटी आणि ३२५.२ लाख गाठी असण्याचा अंदाज आहे.

# बँकांनी लाभार्थ्यांची ...

**(पान १ वरुन) :** विभागीय समन्वयक प्रवीण पाटील, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्राचे सहायक आयुक्त सुरेश वराडे, महामंडळाचे जिल्हा समन्वयक समाधान सूर्यवंशी यांच्यासह विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ८६०३ लाभार्थ्यांना कर्ज मंजूरी झाली आहे. बँकांनी आतापर्यंत ६५० कोटी रुपयांचे कर्ज वितरण केले असून महामंडळाचे ७३ कोटी रुपये व्याज परतावा केला आहे. व्याज परतावा सुरु झालेल्या लाभार्थ्यांची संख्या ७२२० इतकी आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. जिल्ह्यातील माहिती मंगेश केदार यांनी सादरीकरण केले.

श्री. पाटील म्हणाले की, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळमार्फत तरुणांना उद्योग सुरु करण्यासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट प्रकल्प व्याज परतावा योजना राबविण्यात येते. शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजना आहेत. बँकांनी या योजना समजून घ्याव्यात लाभार्थ्यांपर्यंत या योजना वेळेत पोहोचवाव्या. प्रस्तावातील त्रुटींचे तात्काळ निराकरण करुन घ्यावे आणि प्रलंबित व नवीन प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत.

# शाळा संचालकांच्या कडून पालकांची होणारी लूट थांबणार तरी कधी..?.

परिक्षेच्या निकाला नंतर जुन महिना उजाडला कि पालकांची शाळा प्रवेशासाठी धावपळ सुरू होते.नर्सरी पासून पुढील उच्च शिक्षणा पर्यंत शाळा प्रवेश’ हा शब्द ऐकताच हल्ली पालकांना घाम फुटतो.कारण ही तसच आहे.एकिकडे सरकारी शाळा शासन बंद करत आहे तर दुसरीकडे इग्रंजी माध्यमांची भरमसाठ फि हाल्ली इग्रंजी माध्यमा मध्ये नर्सरीची फि २० ते २५ हाजाराच्या घरात आहे.आणि ती प्रत्येक पालकाला परवडतेच आस नाही प्रत्येक पालकाला वाटत आपलं मुल चांगल्या शाळे मध्ये आसव आपले मूल शाळेत जाणार,याचा आनंद दूरच,या उलट त्याला शाळेत घालण्यासाठी कोणते दिव्य पार करावे लागणार.याची चिंताच पालकांना सतावते आसते.

केंद्र सरकारने २००९ साली राईट टू एज्यूकेशन म्हणजेच ठद्वए कायदा पारित केला आहे. संविधानातील कमल २९ आणि ३० च्या तरतुदींना अधीन राहून हा अधिनियम ’बालकांना’ लागू करण्यात आला.जणे करून गरिब मुलांना इग्रंजी मध्यमा मध्ये पहिली ते आठवी पर्यंत शिक्षण घेता येईल ते ही बंद होण्याच्या मार्गावर आहेत कारण ठद्वए मध्ये ही आता नियम बदलले आहेत.एका किलोमीटर आंतरावर जर मराठी मध्यमाची शाळा आसेल तर तुमचे ठद्वए मधुन इग्रंजी शाळे मध्ये तुमचा नबंर लागत नाही.

महाराष्ट्र सरकारने २१ मार्च २०१४ रोजी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन)




कायदा,२०११ हा कायदा लागू केला शाळेची प्रवेश प्रक्रिया,डोनेशन,शुल्क (फी) यासंदर्भात राज्य सरकारने विविध नियमवेळोवेळी ठरवून दिले आसताना ही वेळोवेळी परिपत्रके काढली आसतांना ही काही कायदे ही तयार केले आहेत. त्यामध्ये शिक्षा,दंड तसेच वेळप्रसंगी शाळेची मान्यता रद्द करण्याच्या आदेशाची तरतूद ही आहे. तरीही विविध शिक्षण संस्थांकडून वर्षानुवर्षे या सर्व नियमांची सर्रासपणे पायमल्ली होत आसताना दिसत आहे.यंदाचे वर्षही त्याला अपवाद नाही.

शिक्षण विभागातील अधिकारी आणि शाळा संस्थाचे साटेलोट असल्यानेच शाळांचे मनमानी कारभार होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सर्व खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळा संचालकांनी परस्पर प्रवेश सुरू केले असल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात आहे. शाळा या आता शाळा राहिल्या नसुन मॉल झाल्या आहेत केवळ प्रवेश अर्ज,गणवेश,पिटी गणवेश,टाय,मोजे,शुज,स्कूल बँग,पुस्तक,नोट बुक,यासाठी पालकांकडून हजारोंच्या पटीत पैसे उकळले जात असून,एक ते पाच हजारा पर्यंत अशा अर्जांच्या किमती आहेत.काही ठिकाणी आशी हि परस्थिती आहे कि प्रवेश मिळेलच याची खात्री नसल्याने पालक हजारो रुपये खर्चून पर्याय म्हणून एकाहून अधिक शाळांमध्ये प्रवेश अर्ज भरत आहेत.शाळे कडून पालकांची ही लूट आणि दुसरीकडे मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय शासन घेत आहे. पालकांची ही लुट थांबणार तरी कधी असा प्रश्न सामान्य माणसाला सतावत आहे. म्हणून एका मराठी चित्रपटातील डायलॉग प्रमाणे म्हणावस वाटत शिक्षणाच्या आयचा...घो...

**राजु लोखंडे-७७५७०२०४४४,शहापूर जिल्हा-ठाणे.**

# तुम्हाला माहीत आहे का चांदीचे पैंजण घातल्याने होतात अनेक आरोग्यदायी फायदे ?

अनेक महिलांना पैंजण घालणे आवडते. स्त्रिया बहुतेक पारंपारिक पोशाखांसह पैंजण घालतात. हे तुमच्या लुकमध्ये आकर्षण वाढवतात. पायात पैंजण घालण्याला केवळ धार्मिकच नाही, तर वैज्ञानिक पैलूही आहेत. त्यामुळे पैंजण परिधान केल्याने सौंदर्य तर वाढतेच, पण आरोग्यही सुधारते. त्याच्या आवाजातून सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.



तसेच, ते परिधान केल्याने, काही एक्यूप्रेशर पॉइंटस दाबले जातात. हे आरोग्य फायदे प्रदान करते. चांदीचे गुणधर्म तुम्हाला मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त ठेवतात. पायांना पैंजण घातल्याने कोणते आरोग्य फायदे होतात ते जाणून घेऊया.

पाय दुखण्यापासून मिळतो आराम

धकाधकीच्या जीवनशैलीमुळे महिला अनेकदा पाय दुखत असल्याची तक्रार करतात. अशा परिस्थितीत पैंजण घालणे खूप फायदेशीर असते. होय, पैंजण घातल्याने तुम्हाला या दुखण्यापासून आराम मिळू शकतो. यामुळे शारीरिक कमजोरी दूर होते.

टाचांची सूज कमी करण्यासाठी

काही वेळा उंच टाचाच्या सँडल घातल्यामुळे टाचांना सूज येते. त्यामुळे पाय खूप दुखतात. पायाच्या बोटात वेदना होतात. पण जेव्हा तुम्ही पैंजण घालता, तेव्हा ते रक्ताभिसरण सुधारते. यामुळे पायांची सूज कमी होते.

रोगप्रतिकारक शक्तीही राहते चांगली

तुम्हाला माहिती आहे का की, फक्त अन्न खाणेच नाही, तर पैंजण घालणे देखील रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. यामुळे लिम्फ ग्रंथी सक्रिय होतात. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. मजबूत रोगप्रतिकारक शक्ती आपल्याला अनेक रोगांशी लढण्यास मदत करते.

हार्मोनल संतुलनासाठी

हार्मोनल असंतुलनामुळे अनेक महिलांना त्रास होतो. यामुळे वंध्यत्व आणि अनियमित मासिक पाळी यांसारख्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा स्थितीत चांदीचे पैंजण घातल्याने फायदा होऊ शकतो. यामुळे तुमचे हार्मोन्स संतुलित राहतात.

शरीराचे तापमान

चांदीचे पैंजण घालणे देखील शरीराचे तापमान संतुलित करण्यास मदत करते.

उत्तम रक्ताभिसरणासाठी

अँकलेटस घातल्याने महत्त्वाचे मुद्दे दाबले जातात. त्यामुळे शरीरात कंपन निर्माण होते. यामुळे रक्ताभिसरण सुधारते. पैंजण घातल्यानेही शरीराच्या दुखण्यापासून आराम मिळतो.

# डाळिंबाच्या साल अत्यंत गुणकारी, फायदे जाणून तुम्हीही व्हाल चकित

फळ आणि भाज्यांमध्ये आपल्या शरीराला आवश्यक असणारी प्रथिने, जीवनसत्व आणि इतर आवश्यक घटक मिळतात. पण तुम्हाला माहित आहे का फळांच्या सालीमध्येही अनेक औषधी गुणधर्म असतात. आपल्या शरीरासाठी हे फायदेशीर ठरतात. फळांच्या साली आपण कचऱ्यामध्ये फेकून देतो. पण या फळांच्या सालीचेही अनेक फायदे असतात, हे आपल्याला माहित नसतं. जर तुम्हीही डाळिंबाची साल कचरा समजून फेकून देत असाल, तर थांबा आणि त्याचे फायदे माहित जाणून घ्या.



डाळिंबाची साल अनेक आजारांवर आयुर्वेदिक उपाय आहे. डाळिंबाची साल सुकवून त्याची पावडर करुन घ्या. डाळिंबाच्या सालीची पावडर घसादुखी, खोकला, पोटाच्या समस्या आणि हाडांच्या आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. फळांच्या सालींपेक्षा भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडंटस असतात.

डाळिंबाच्या सालीची पावडर कशी बनवायची?

एका भांड्यात डाळिंबाची सालं घ्या. सालीवरील पातळ सफेद भागही घ्या. या साली ओव्हनमध्ये ३५० अंशांवर २० मिनिटे गरम करा. यामुळे साली सुकतील. साली सुकल्यानंतर त्यांची बारीक पावडर बनवून घ्या. डाळिंबाची पावडर तयार आहे.

डाळिंबाच्या सालीचा असा करा वापर

डाळिंबाच्या सालीची चहा बनवून तुम्ही त्याचा आस्वाद घेऊ शकता. डाळिंबाच्या सालीचा चहा बनवण्यासाठी एक रिकामी टि बॅग घ्या. यामध्ये एक चमचा डाळिंबाची पावडर टाका. आता ही टी बॅग एक कप गरम पाण्यामध्ये बुडवा. काही मिनिटं ठेवा. तुमचा डाळिंबाचा चहा तयार आहे.

डाळिंबाची साल आरोग्यासाठी उपयुक्त

अतिसार आणि इतर पचन समस्यांवर देखील डाळिंबाची साल एक उत्तम घरगुती उपाय आहे. डाळिंबाची साल व्हिटॅमिन सीचा उत्तम स्त्रोत आहे. महागड्या व्हिटॅमिन सप्लिमेंटसऐवजी तुम्ही आहारात याचा वापर करु शकता. डाळिंबाचा चहा बनवून किंवा गरम पाण्यात डाळिंबाची पावडर मिसळून तुम्ही त्याचं सेवन करु शकता.

डाळिंबाच्या सालीची पावडर अत्यंत गुणकारी

त्वचारोग तज्ज्ञांच्या मते, सालीमध्ये अँटी-ऑक्सिडंटस जास्त असल्याने ते बॅक्टेरिया आणि इतर संसर्गापासून बचाव करण्यास मदत करतात.

डाळिंबाच्या सालीमध्ये अनेक गुणधर्म असतात ज्यामुळे हानिकारक किरणांपासून त्वचेचं संरक्षण करतात आणि त्वचेच्या पेशी पुन्हा निर्माण करतात.

डाळिंबाची साल ही तुमच्या त्वचेच्या सर्व समस्यांवर उपायकारक आहे.

डाळिंबाची साल त्वचेचा डिटॉक्सिफायर म्हणून काम करून मदत करते, जे विषारी हटवण्यास मदत करते. डाळिंबाच्या सालीचा त्वचेवर वापर केल्यास तुमची त्वचा मऊ आणि मुलायम होईल.

# त्यांच्या वाणीतून....

नालंदा उत्खननात सापडलेल्या अवशेष स्थळाला भेट देणे अविस्मरणीय होते. प्राचीन काळच्या जगातील विद्येच्या सर्वात मोठ्या केंद्रांपैकी एका स्थळाला भेट देण्याची ही संधी होती. हे स्थळ एकेकाळी येथे बहरलेल्या विद्वतेच्या भूतकाळाची झलक दाखवते.नालंदा विद्यापीठाने एक बौद्धिक चैतन्य निर्माण केले आहे जे आजही आपल्या देशात निरंतर वृद्धिंगत होत आहे.

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंडाची भावना येऊ न देता शिकविणे जिकिरीचे काम आहे. नवीन शैक्षणिक धोरणातही या बाबीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. राज्यातील दृष्टीहीन व दिव्यांग शिक्षकांच्या समायोजनासाठी शासन सकारात्मक असून याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणावा.

**- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

बाळासाहेब ठाकरेंचा फोटो न लावता, शिवसेनेचे चिन्ह न लावता माझ्या विरोधात निवडणूक लढवून दाखवा. नाहीतर षंढ म्हणून गावामध्ये फिरा. भाजप म्हणून फिरू नका. मला एका गोष्टीचा अभिमान आहे, आम्ही कुणाचाही फोटो वापरला नाही.

**- उद्धव ठाकरे**

## धूत ट्रांन्समिशन व टाटा मोटर्सच्या कॅम्पस मुलाखतीमधून स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निकच्या ९० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

लातूर : येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक कॉलेज एमआयडीसी, लातूर या महाविद्यालयामध्ये धूत ट्रांन्समिशन व टाटा मोटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने पॉलिटेक्निकमधील यंत्र, अनुविद्युत व दूरसंचार, विद्युत अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीमध्ये स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक कॉलेजचे ९० विद्यार्थी पात्र झाले असून या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या माध्यमातून नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.धूत ट्रांन्समिशन व टाटा मोटर्सच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या स्वामी विवेकांनद पॉलिटेक्निक महाविद्यालय, लातूर येथील कॅम्पस मुलाखतीला उपस्थित झालेल्या १६५ विद्यार्थ्यांपैकी ९० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना या माध्यमातून नोकरी करण्याची संधी मिळणार आहे. यावेळी स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक कॉलेजचा माजी विद्यार्थी प्रशांत जाधव हा देशामध्ये नावाजलेल्या उद्योग समुह टाटा मोटर्समध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत असून त्यांना या मुलाखतीच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक कॉलेजध्ये उपस्थित राहण्याचा योग आला.

## लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आज आतंरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका) : दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा प्रशासनाच्यावतीने योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.



दरवर्षीप्रमाणे यंदाही आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करून योगा विषयी प्रचार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत यादृष्टीने सर्व संबंधितांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच ग्रापंचायतीपासून ते जिल्हास्तरापर्यंत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पतंजलि योगपीठ, प्रजापिता ब्रह्मकुमारी, सुप्रभात ग्रुप, नॅशनल योगासन स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया आदी संस्थांची यामध्ये सहभाग असणार आहे.

'योग-स्वयंम और समाज के लिए योग ही यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची टॅगलाईन असून या संकल्पनेवर हा दिवस साजरा करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा क्रीडा संकुल येथे आतंरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी सकाळी ६ पासून विविध कार्यक्रम होणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

२१ जून रोजी सकाळी ६ वाजता योगा विषयक जनजागृतीसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून जिल्हा क्रीडा संकुलपर्यंत प्रभातफेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. सकाळी ६.३० पासून जिल्हा क्रीडा संकुल येथे प्राथमिक व्यायाम सुरू होतील. सकाळी ७ ते ७.४५ या कालावधीत प्रत्यक्ष योगाभ्यास होईल, तरी लातूरकर नागरिकांनी उत्स्फूर्तपणे या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनाला येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था

जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिनाला येणाऱ्या नागरिकांच्या दुचाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन येथे करण्यात आली आहे. तसेच चारचाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बस डेपो परिसरात करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे

# (गुरु वचन)

## दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे हीच इश्वर सेवा

वाणी, तन, मन, वचन आणि धन जी कोणतीही शक्ती आपल्याजवळ असो. तिच्याद्वारे आपण कुणाचे दु:ख तीळमात्रही कमी केले किंवा त्याच्या दु:खात आपण सहभागी झालो तर ही सर्वात मोठी इश्वर सेवा होय. मानवाच्या प्रवृत्तीत स्वाभाविकरित्या आपल्या सुख-सुविधा पाहण्याचा स्वार्थ निर्माण होतो. उपदेश देणाराही प्रकारान्तर आपल्याला समोर ठेवतो आणि म्हणतो तुम्ही भक्तांचा सन्मान करा. परमेश्वरही आपल्या भक्तांचा सन्मान करतो. व्यक्ती अर्थात आपण भक्त आहोत आणि तुम्ही आमचा सन्मान करा. आपली चर्चा करण्याची पद्धत वेगवेगळी असते. म्हणतात की, ज्ञानप्राप्तीनंतर काहीही करायला नाही पाहिजे. शेवटी तुम्ही समजलात आपण काहीही करु शकत नाहीत तर आपल्या परमेश्वराचे प्रेम मिळाल्यावर कोणी त्याचा निषेध करत नाही तर तुम्ही समजून घ्या की, आपण प्रेमी आहोत. परमेश्वराचे प्रेमी आहोत. हे छळाचे जीवन आहे आणि छळपूर्ण जीवनात दुसऱ्यांचा छळ करणे गुन्हा आहे. निर्णय परमेश्वरच घेतो. परंतु एवढा विश्वासू मात्र आवश्यक आहे की तो प्रेमळ आहे. आपल्याला गुन्ह्याला कमी समजणे हे त्याचे प्रेम आहे. परंतु आपण त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग करायला नाही पाहिजे. त्याच्या प्रेमावरुन आपण स्वत:ला जनतेसमोर अशाप्रकारे सादर करा की, ते भ्रमात येतील हे स्वत:ला भ्रमात ठेवण्यासारखे आहे. ही गोष्ट मनुष्याने सदैव लक्षात ठेवली पाहिजे की, त्याला आपले भले करायचे असेल तर कुणाचयाही ऐकण्या-बोलण्याने वा कोणत्याही प्रकारच्या वाक्य संयोगाने स्वत:ला जिंकणे आहे. यापेक्षा अधिक ऐकले नाही तर मोठा धोका ठरेल. त्याच्या प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले जातील आणि कष्ट करण्याची वेळ येऊ लागेल.

# उपदेशकथा हुशार टोळ

एक टोळ उंच झाडावर बसून आनंदाने किरकिर आवाज करीत बसला होता. एका कोल्ह्याने त्याला पाहिले आणि त्याला खाऊन टाकण्याकरिता त्याने एक बेत आखला. कोल्हा झाडाखाली उभा राहून म्हणाला, 'काय सुंदर आवाज आहे रे तुझा? पण जरा खाली येतोस का? तुझा आवाज तर चांगला मोठा पल्लेदार आहे. पण तू आहेस तरी केवढा? मला मोठे कुतूहल वाटतंय.

पण तो टोळ कोल्ह्याच्या युक्तीला फशी पडला नाही. त्याने झाडाचे एक पान तोडले आणि ते खाली टाकले. कोल्ह्याला वाटले, टोळच खाली पडला. एवढ्यात टोळ म्हणाला, 'तुला काय वाटलं मीच खाली आलो म्हणून! पण एक गोष्ट लक्षात ठेव, मी एकदा कोल्ह्याच्या विष्ठेत टोळाचे पंख पाहिले होते. तेव्हापासून कोल्हा दिसला की मी सावधगिरीने वागतो.'

कथा उपदेश : सावधगिरी हाच शहाणपणा.

# राशी भविष्य २१ जून २०२४

मेष : शुभ रंग :हिरवा,शुभ दिशा:उत्तर

मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठ्या व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. त्यामुळे भविष्यात फायदा होईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व

कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे. कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

मिथुन : शुभ रंग: निळा,शुभ दिशा: उत्तर

आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नौकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी राहील.

कर्क : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम

पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या. आजचा दिवस व्यस्त जाईल.

सिंह : शुभ रंग: पांढरा,शुभ दिशा: पूर्व

प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल. व्यावसायात गोपनियता ठेवा.

कन्या : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा : उत्तर

व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील. मुलांकडून सहकार्य मिळेल.

तुळ : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम

आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका. व्यापार व्यवसाय सामान्य राहील. अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व

आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका.

धनु: शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर

व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल. अनावश्यक कामे टाळा.

मकर: शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पूर्व

आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

कुंभ : शुभ रंग :लाल, शुभ दिशा :उत्तर

आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

मीन : शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: पूर्व

नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू नका.

# इतिहासात आजचा दिवस, २१ जून

अंतरराष्ट्रीय

१७४९ - कॅनडाच्या नोव्हा स्कॉशिया प्रांतात हॅलिफॅक्स शहराची स्थापना.

१७८८ - न्यू हॅम्पशायर अमेरिकेचे नववे राज्य झाले.

१८७७ - पेनसिल्व्हेनियात १० कामगार नेत्यांना फाशी देण्यात आली.

१८९८ - गुआम अमेरिकेचा प्रांत झाला.

१९४० - दुसरे महायुद्ध - फ्रांसने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.

१९४२ - दुसरे महायुद्ध - जर्मन सैन्याने टोब्रुक जिंकले.

१९४५ - दुसरे महायुद्ध - ओकिनावाची लढाई संपली.

१९६४ - अमेरिकेत मिसिसिपी राज्यात समान हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्या ३ व्यक्तींना कु क्लुक्स क्लॅन ठार मारले.

१९७५ - वेस्ट इंडीझने पहिला क्रिकेट विश्वचषक जिंकला.

१९८९ - अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने देशाचा ध्वज जाळण्याची कृती ही वाचास्वातंत्र्याची अभिव्यक्ती असल्यामुळे वैध ठरवली.

२००४ - स्पेसशिपवन या पहिल्या खाजगी अंतराळयानाचे पहिले उड्डाण.

२००८ - कॅनडात १५० वर्षानंतर क्रिकेटला पुन्हा राष्ट्रीय खेळ घोषित करण्यात आले.

राष्ट्रीय

१६७४ - 'श्री शिवराज भूषण' या काव्याचे लेखन कवी भूषण यांनी पूर्ण केले.

१९३४ - पुणे येथे महात्मा गांधी यांच्या हस्ते 'हिंदी प्रचार संघ' या संस्थेची स्थापना.

१९९१ - भारताच्या पंतप्रधानपदी पी.व्ही.नरसिंह राव.

२००६ - गोव्यात इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय अनिवार्य करण्यात आले.

२००७ - भारतात पहिल्यांदाच झालेल्या जागतिक कराटे स्पर्धेत सहा वर्षीय गणेशने सुवर्ण पदक जिंकले.

२००७ - कोट्यवधी रूपयांच्या मुद्रांक घोटाळ्यातील प्रमुख आरोपी अब्दुल करीम तेलगी याच्यासह दोन डॉक्टरांना विशेष न्यायालयाने सात वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठाविली.

२००८ - प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक तपन सिन्हा यांना भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्यावतीने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जन्म

१००२ - पोप लिओ नववा याचा जन्म.

१२२६ - बोलेस्लॉस पाचवा, पोलंडचा राजाचा जन्म.

१७३२ - योहान क्रिस्चियन बाख, जर्मन संगीतकारचा जन्म.

१७८१ - सिमिओन-डेनिस पॉइसॉन, फ्रेंच गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञाचा जन्म.

१९०५ - ज्याँ-पॉल सार्त्र, फ्रेंच लेखक व तत्त्वज्ञानीचा जन्म.

१९२३ - सदानंद रेगे, मराठी कवी, कथाकार आणि अनुवादकचा जन्म.

१९३७ - जॉन एडरिच, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.

# आ अभिमन्यू पवार यांचा पाठपुरावा लातूर जिल्हा रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची १० एक्कर जागा हस्तांतरित करण्यासाठी ३.३२ कोटींचा निधी..

लातूर – आ अभिमन्यू पवार व माझं लातूर परिवाराच्या उपोषणाला पाठपुराव्याला यश आले असून लातूर जिल्हा रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची १० एक्कर जागा हस्तांतरित करण्यासाठी ३.३२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. आता जागा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करवून घेऊन लातूर जिल्हा रुग्णालयाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याचा प्रयत्न राहील अशी माहिती आ अभिमन्यू पवार यांनी दिली आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांच्या मागणीवरून लातूर जिल्हा रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची वापरात नसलेली १० एक्कर जागा हस्तांतरित करण्यास ४ फेब्रुवारी, २०१९ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मंजुरी दिली होती. जागा हस्तांतरणासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने लातूर कृषी महाविद्यालय आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी ला



देय असलेल्या निधीची तरतूद करण्यात न आल्यामुळे हा विषय रखडला होता. या विषयासंदर्भात ऑक्टोबर २०२३ मध्ये माझं लातूर परिवाराच्या वतीने उपोषण करण्यात आलेलं तेंव्हाही उपोषणस्थळी आ अभिमन्यू पवार यांनी भेट देऊन निधीची तरतूद करुन घेण्याचा शब्द दिला होता. त्यानंतर २४ जून, २०२४ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आ पवार यांनी भेट घेऊन जागा हस्तांतणासाठी लागणारे ३.३२ कोटी रुपये उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती.माझं लातूर परिवाराच्या उपोषणाला आणि आ अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश आले असून लातूर जिल्हा रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची १० एक्कर जागा हस्तांतरित करण्यासाठी ३.३२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. आता जागा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करवून घेऊन लातूर जिल्हा रुग्णालयाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याचा प्रयत्न राहील असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा डॉ तानाजी सावंत व लातूरचे पालकमंत्री गिरीशजी महाजन यांचे आ अभिमन्यू पवार यांनी आभार मानले आहेत.

**मुख्यमंत्री कार्यालयात असल्यापासून पाठपुरावा – आ अभिमन्यू पवार**

याप्रसंगी जागा हस्तांतणाचा निर्णय घेणारे तत्कालीन कृषिमंत्री स्व भाऊसाहेब फुंडकर व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी चे तत्कालीन कार्यकारी परिषद सदस्य स्व विनायकराव मेटे यांचे मला आवर्जून स्मरण होत आहे कारण लातूर जिल्हा रुग्णालयाला कृषी महाविद्यालयाची जागा देण्याच्या निर्णयात त्यांचे निर्णायक योगदान आहे. लातूर जिल्हा रुग्णालयासाठी मी मुख्यमंत्री कार्यालयात काम करत असल्यापासून प्रयत्न करत असल्याने या निर्णयाचा मला विशेष आनंद आहे.

आ अभिमन्यू पवार..

# अनुसूचित जमातीतील नागरिकांसाठी शबरी आवास योजना लाभ घेण्याचे लातूर मनपाचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी : अनुसूचित जमातीतील नागरिकांसाठी राज्य शासनाच्या वतीने शबरी आवास योजना सुरू करण्यात आली असून पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.




राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे.या अंतर्गत अनुसूचित जमातीतील ज्या नागरिकाकडे स्वतः चे घर नाही अशांना योजनेतून घर बांधकाम करण्यासाठी अनुदान दिले जाणार आहे.यासाठी संबंधित व्यक्ती अनुसूचित जमातीतील असावा. त्याचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असावे. त्या व्यक्तीच्या नावे पक्के घर नसावे तसेच बांधकाम करण्यासाठी जागा असणे आवश्यक आहे.पात्र लाभार्थ्याचे बँक खाते गरजेचे आहे.

संबंधित व्यक्ती १५ वर्षांपासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. यापूर्वीच्या कुठल्याही घरकुल योजनेचा लाभ त्याने घेतलेला नसावा. वार्षिक उत्पन्न तीन लाखांच्यावर नसावे,असे या योजनेचे निकष आहेत.

या योजनेत लाभार्थ्याला २६९ चौरस फूट क्षेत्रावर बांधकाम करावयाचे आहे.अर्ज मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्याला चार टप्प्यांमध्ये २.५० लक्ष रुपये अनुदानाचे वितरण केले जाणार आहे.

या योजनेसाठी अर्ज करताना लाभार्थ्यांनी रहिवासी प्रमाणपत्र, नजीकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो,तीन लाख रुपयांच्यावर उत्पन्न नसल्याचे तहसीलदारांचे प्रमाणपत्र,रद्द केलेला धनादेश अथवा बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र,जागा उत्पन्न उपलब्ध असल्याचा दाखला,शिधापत्रिका व आधार कार्ड ही कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

पात्र व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी दिनांक ०५ जुलै पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी महानगरपालिकेतील घरकुल योजना विभाग रुम.न.२ येथे संपर्क साधण्याचे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे २४ जून रोजी लातूर येथे आयोजन

लातूर, (जिमाका) : येथील औसा रोडवरील वाडा हॉटेलजवळील कस्तुराई मंगल कार्यालय येथे २४ जून २०२४ रोजी छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे.

क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्यासह विविध कार्यालयाचे विभाग प्रमुख, प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ या शिबिरासाठी उपस्थित राहणार आहेत.

शिबिरामध्ये इयत्ता दहावी, बारावीनंतर काय ? भविष्यातील रोजगाराच्या संधी, व्यक्तीमत्व विकास, बायोडाटा तयार करणे व मुलाखतीची तयारी, नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी याविषयी, तसेच शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देणाऱ्या बँका, विविध महामंडळे शासकीय योजनांची माहिती, कलमापन चाचणी, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना व कर्ज योजना याबाबत माहिती व करिअर मार्गदर्शन तज्ज्ञ मार्गदर्शनाकडून मार्गदर्शन होणार आहे.

लातूर येथे होत असलेल्या छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीरास सर्व युवक–युवती व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यंनी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी कु. एम. आर. बोरुळकर आणि कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त बी. एस. मरे यांनी केले आहे.

# लातूर येथील माजी सैनिक मुलांचे वसतिगृहात अशासकीय सहायक अधीक्षक पदभरती

लातूर, (जिमाका) : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या आस्थापनेवरील माजी सैनिक मुलांचे वसतिगृह, लातूर येथे अशासकीय सहायक अधिक्षक पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमहा रक्कम रुपये २४ हजार ४७७ प्रमाणे भरण्यात येणार आहे.

या पदासाठी इच्छूक माजी सैनिक उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी २८ जून, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे स्वत: उपस्थित रहावे. निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कंत्राटी कामगार वाहन चालक हयांच्या न्याय हक्कासाठी कामगार आक्रोश मोर्चा

मीरा भाईंदर शहर प्रतिनिधि –वंचित बहुजन आघाडी च्या वंचित बहुजन माथाड़ी ट्रांसपोर्ट व जनरल कामगार आघाडी.मीरा भाईंदर शहर तर्फे मा.आयुक्त साहेबांना वारणवार पत्र देण्यात आले होते मिनिमम कायदयानुसार किमान वेतन देण्यासाठी मनपा तर्फे देण्यात आलेल्या पत्राचे उत्तर कंत्राटदारा मार्फ़त देण्यात आले नाही. वाराणवार तक्रारी देऊन सुधा कंत्राटदार तसेच मीरा भाईंदर महानगर पालिकेतर्फे काहीच करवाई झाली नाही. तसेच कंत्राटदारावर सुधा करवाई झाली नाही. म्हणून दिनांक १९/०६/२०२४,बुधवार रोजी वेळ दुपारी २ वाजता कंत्राटी कामगार वाहन चालक हयांच्या न्याय हक्कासाठी सर्व कंत्राटी वाहन चालक तसेच कामगार ह्याना घेऊन मा.विश्र्वनाथ तायडे महासचिव वंचित बहुजन आघाडी हयांच्या अध्यक्षतेखाली मीरा भाईंदर महानगर पालिकेवर आंदोलन करण्यात आले ह्या वेळेस मीरा भाईंदर शहरातील सफाई कामगार तसेच वाहन चालक हजर होते.तसेच अतिरिक्त आयुक्त यांच्याशी चर्चा झाली असता सर्व समस्ये वर लवकरच तोड़गा काढण्यात येईल असे आश्र्वासन देण्यात आले.या प्रश्र्नावर जर लवकर तोड़गा निघाला नाही तर गाड़ी बंद करो आंदोलन घेण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.



**जीवन..**
**(वट पौर्णिमा)**

सणवार महोत्सव
जणू इव्हेंट रे सारे
बेगडी असे देखावे
वाटे खरोखर पुरे
वट पौर्णिमा आली
वृक्षा भोवती फिरे
कचरा तसाचं पडे
दुसरे दिवशी विसरे
फाद्यां तोडून विका
पोट दुकानदार भरे
संस्कृतीनावाखाली
वृक्षाला विवस्त्र करे
सावित्री पुजेत मग्न
रे असे कसेही नवरे
पुरूषी अहंकाराले
पायात सदा भोवरे
व्रत पुरुषां का नसे
प्रश्र्न मनातला विरे
कडक उपवासानी
रे महिलांना गरगरे
मरण चुकले कुणा
त्रिवार सत्य हे खरे
नावा पुरती वैकल्ये
सांभाळी का नखरे
दांपत्य जीवन छान
सकुटुंब जगू सुस्वरे
जरी गेलो जगातूनि
किर्ती रुपात गा उरे

२

**सबका विकास ..**
**(योगाभ्यास)**

धडाक्यात चालवतो
योगासनांचा क्लास
जाहिरात गाजलेली
चरबी होईलं खलास
तंदुरुस्त करु सकला
आमचा एकचं ध्यास
दोन महिन्यात अर्धा
होईलं पोटाचा व्यास
टायगरश्रॉफ आहोत
आपणा होती भास
बाहुबली मधला मी
सुडौल भासे विभास
बाजूलाचं बायकोचे
फास्टफूडसेंटर खास
क्लास भर दर्वळतो
भुरळ घाली नाकास
क्लासनंतर तिथे जा
आमंत्रण देतो वास
विरंगुळा हवा भला
रे दमलेल्या जीवास
दोन्ही धंदे नाही वांदे
चालले मस्त झकास
तत्व आमचे एवढेचं
सबका साथ विकास
वाढाया लागली गर्दी
बसू लागला विश्र्वास
योगासनं झाला धंदा
चाले मजेत झकास

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# हाकेतांडा येथे महिला मेळावा

रेणापूर : जिल्हा परिषद प्राथमिक



शाळा हाकेतांडा ता. रेणापूर येथे रेणापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सुमित जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे शाळा पूर्व तयारी निमित्त गावातील सर्व महिलांना एकत्र करून शाळा पूर्व तयारी मेळावा घेण्यात आला.

या मेळाव्यामध्ये मुलांची शिक्षण त्यांचा अभ्यास, वैयक्तिक स्वच्छता परिसर स्वच्छता, आरोग्य, अभ्यास, वृक्षारोपण व पर्यावरणाचे संवर्धन, विद्यार्थ्यात शैक्षणिक गुणवतेत वाढ, या विषयावर गणेश सावळकर व जाकीर सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले, मुलींचे शिक्षण या विषयावर रेणापूर गटसाधन केंद्राच्या विषय तज्ञ छाया सदाफुले मॅडम, आणि आचमे मॅडम यांनी सखोल मार्गदर्शन केले, निपुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी विश्र्वनाथ आरोतले यांनी माहिती दिली. महिला मेळाव्यानंतर महिलांच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये गावातील सर्व महिलांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला स्पर्धेनंतर विजयी स्पर्धकांना विविध प्रकारचे संसार उपयोगी भांडी, शालेय शैक्षणिक साहित्य बक्षीस च्या स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. या कार्यक्रमात केंद्रप्रमुख शिवाजी लोखंडे सर, केंद्रीय मुख्याध्यापक होळकर मॅडम, माया सावळकर मॅडम ,गावातील सर्व ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी, पालक सहभागी झाले होते.

दयानंद शिक्षण संस्था लातूर, संचलित
दयानंद कला महाविद्यालय, लातूर
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित
बी. ए.
विषय :- मराठी, इंग्रजी, हिंदी, समाजशास्त्र, इतिहास, लोकप्रशासन, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, संगीत, भूगोल, पर्यावरणशास्त्र, नाट्यशास्त्र, मानसशास्त्र, NCC
डिपार्टमेंट ऑफ ॲनिमेशन
बॅचलर ऑफ आर्टस् ॲनिमेशन ॲण्ड वेब डिझाईन
डिपार्टमेंट ऑफ फॅशन डिझाईन
बॅचलर ऑफ आर्टस् फॅशन डिझाईन
डिपार्टमेंट ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेस
बॅचलर ऑफ आर्टस् ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेस
प्रवेश (2024-2025)
बी. ए. प्रथम वर्षासाठी प्रवेश व नोंदणी सुरु आहे.
प्रवेश पात्रता १२ वी (कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण)
वैशिष्ट्ये
तीन वर्षांचे स्वतंत्र पदवी अभ्यासक्रम
शासनाच्या नियमाप्रमाणे शिष्यवृत्तीची सोय
अद्यावत सुविधांनी सुसज्ज संगणक प्रयोगशाळा व ग्रंथालय
विद्यार्थी व विद्यार्थिनींना वसतिगृहाची सोय
तात्काळ नोकरीची संधी
D.D.G.M. डिप्लोमा धारकांना बी.ए. फॅशन द्वितीय वर्षात सरळ प्रवेश
संपर्क : ॲनिमेशन विभाग 8956381299 फॅशन विभाग 9860824933 ॲडमिनिस्टेटिव्ह विभाग 9423720148
डॉ. शिवाजी गायकवाड, प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय, लातूर
श्री. रमेश बियाणी, सचिव, दयानंद शिक्षण संस्था, लातूर
श्री. ललितभाई शहा, अध्यक्ष, (शालेय समिती), दयानंद शिक्षण संस्था, लातूर
श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, अध्यक्ष, दयानंद शिक्षण संस्था, लातूर

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894